MHNG030068542026

**फौजदारी किरकोळ अर्ज/१२१७/२०२६**

**महिंद्रा अँड महिंद्रा फायनान्शियल सर्विसेस लिमिटेड वि.. महाराष्ट्र राज्य**

**मधील नि.क्र.१ वरील अंतिम आदेश**

१. अर्जदार Mahindra and Mahindra Financial Services Ltd., मार्फत कुलमुखत्यारधारक नामे श्रीकांत प्रकाश बंडीवार यांनी प्रस्तूत अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४९७ प्रमाणे गणेशपेठ पोलीस स्टेशन, नागपूर यांनी गुन्हा क्र.३९२/२०२४ मध्ये जप्त केलेले महिंद्रा कंपनीचे Mahindra Bolero Camper Huber PS 2WD चारचाकी वाहन क्र.एमएच–४९–एटी–८५१७ सुपूर्तनाम्यावर परत मिळणेसाठी व विक्री करण्याची परवानगी मिळणेकरिता दाखल केला आहे.

२. सरकारी वकीलांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केले असुन त्यांनी त्यांचे म्हणण्यामध्ये जप्त मुद्देमाल हा पुरावा असल्यामुळे, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास तपासी अधिकारी यांनी त्यांचे म्हणने नि.क्र.५ वर सादर केले. त्यांनी त्यांचे म्हणण्यामध्ये सदरची मालमत्ता फिर्यादी कंपनीचे ताब्यात दिल्यास ते त्याची विक्री करून विल्हेवाट लावण्याची शक्यता असल्याने अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. दोन्ही पक्षांतर्फे स. विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

५. अर्जदाराने प्रस्तुत प्रकरणी त्याचे शपथपत्र दाखल करुन कथन केले की, सदरचे वाहन हे तपासकामी जप्त करण्यात आले आहे. अर्जदारातर्फे नि.क्र.३

समवेत कागदपत्रे दाखल करण्यात आली आहेत. अर्जदारातर्फे सादर करण्यात आलेल्या कर्जाचा करारनामा व खाते उतारेनुसार वाहनाचे मूळ मालक मनिष प्रेम अहिरवार यांनी प्रस्तुत वाहन खरेदी करण्याकामी अर्जदाराकडून रक्कम रू.८,१४,०००/– कर्जाने घेतल्याचे दिसून येते. तसेच कर्जाच्या करारनाम्यानुसार कर्जदाराने कर्जाचे हफ्ते थकीत ठेवल्यास अर्जदार वाहन विक्री करण्यास सक्षम असल्याचे दिसून येते. तसेच वाहनाच्या आरसी बुकवर देखील अर्जदाराचे नाव फायनान्सर म्हणून नमूद केल्याचे दिसून येते. त्यामुळे अर्जदारास सदरचे वाहन परत करण्यास कोणतीही कायदेशीर बाधा येत नाही.

६. मी **मा. सर्वोच्च न्यायालय यांनी सुंदरभाई अंबालाल देसाई विरुध्द गुजरात शासन ए.आय.आर.२००३ सर्वोच्च न्यायालय पान क्र.६३८** मध्ये दिलेल्या न्यायनिवाडयाचे अवलोकन केले. सदर निवाडयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने असे स्पष्ट केले आहे की, जप्त वाहन पोलीस ठाण्यात जास्त काळ न ठेवता त्या संदर्भात लवकरात लवकर योग्य ते आदेश करावेत.

**७.** वाहन मोकळया हवेत विना वापर ठेवल्यास त्यामध्ये बिघाड होण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत जप्त वाहन विना वापर एका जागेवर केसचा निर्णय होईपर्यंत उभे ठेवण्यात काहीच उपयोग नाही. तसेच प्रस्तुत वाहनाची मालकी दाखवणारा दुसरा इसम या प्रकरणात हजर झालेला नाही. त्यामुळे सदरचे वाहन जप्त ठेवुन कोणताही उपयोग होणार नाही. वरील सर्व बाबींचा विचार करता सदर वाहन अटी व शर्तींवर अर्जदाराच्या अंतरिम ताब्यात देणे तसेच करारनाम्यानुसार अर्जदारास अटींवर वाहन विक्री करण्याची परवानगी देणे उचित होईल. करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

**१.** अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. तपासी अंमलदार पो.स्टे. गणेशपेठ, नागपूर यांना आदेशीत करण्यात येते की त्यांनी गु.र.नं.३९२/२०२४ मध्ये जप्त महिंद्रा कंपनीचे Mahindra Bolero Camper Huber PS 2WD चारचाकी वाहन क्र.एमएच–४९–एटी–८५१७ हे अर्जदार Mahindra and Mahindra Financial Services Ltd., मार्फत कुलमुखत्यारधारक नामे **श्रीकांत प्रकाश बंडीवार** यांच्या ताब्यात रक्कम रुपये १०,००,०००/– (रुपये दहा लाख) च्या हमी पत्रावर (Indemnity Bond) खालील अटींवर देण्यात यावे.

३. निरीक्षक, गणेशपेठ पोलीस स्टेशन, नागपूर यांनी जप्त वाहन व त्याच्या वर्णनाचा तपशिलवार पंचनामा करुन जप्त वाहनाचे छायाचित्र जतन करावे व सदर वाहन परतीच्या अनुषंगानेची सर्व कागदपत्रे व अभिलेखाचे रितसर जतन करावे.

४. अर्जदार यांनी सदर जप्त वाहन व त्याची कागदपत्रे तपासी अधिकारी यांना तपासादरम्यान आवश्यकता भासल्यास संबंधित कार्यालय येथे हजर करावे.

५. **अर्जदाराची सदर वाहन विक्रीची मागणी खालील अटी व शर्तींवर मंजूर करण्यात येते–**

अ) अर्जदार याने सदर वाहनाचे विक्रीपुर्वी त्याचे चारही बाजूने फोटो घेवून/काढून ते निगेटीव्हस सहीत न्यायालयात दाखल करावेत.

ब) अर्जदाराने सदर वाहनाच्या विक्रीच्या कार्यवाहीस जास्तीत जास्त लोकांपर्यंत त्याची माहिती पोहचेल म्हणजेच त्याच्या विक्रीबाबतची याची काळजी घ्यावी. तसेच अभिलेखावर जे नोंदणीकृत मालक दिसून येत आहे त्यांना देखील त्याबाबतची कल्पना दयावी.

क) सदर वाहनाची विक्रीतून येणा–या रकमेची कागदपत्रे अर्जदाराने न्यायालयात दाखल करावीत.

ड) अर्जदाराने सदर वाहनाची विक्री व त्याचे कार्यवाहीबाबतचा एक पंचनामा देखील करावा, जो की, याकामी सदर वाहनास कोणतीही खूण देण्याच्या बदल्यात, पुरावा म्हणून वाचण्यात येईल.

इ) अर्जदाराने न्यायालयात एक असे हमीपत्र सादर करावे की, ते सदरचे वाहन हे केस प्रॉपर्टी आहे आणि न्यायालय जेव्हा कधी आदेश करेल तेव्हा ते न्यायालयात हजर करण्याचे आहे, या बाबी विक्रीच्या करारामध्ये/त्या कागदामध्ये, ते ठळकपणे व न चुकता नमूद करतील.

ई) सदर वाहनाची मालकीच्या हस्तांतरणाची कार्यवाही/त्याचे हस्तांतर हे या अथवा अन्य कोणत्याही न्यायालयाच्या आदेशास अधीन राहिल, जो की, अथवा जो भविष्यात पारित केला जाईल.

Digitally signed by KAUSTUBH NAGESH MARATHE
Date: 2026.03.18 15:16:24 +0530

**(कौस्तुभ नागेश मराठे)**

**दि. १८.०३.२०२६**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**

**न्यायालय क्र.१, नागपूर.**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Order are same word to word, as per the original Order.

Name of the Stenographer : P. M. Chaware